FORM-1 A

N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे का. प्र. वि, पहिली खबर क्र. ०६ वर्ष २०१६, दिनांक ०५/०२/२०१६
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act अत्याचार अधि १९८८, कलमे Sections ७
(ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार शनिवार तारीख पासून ०२/०२/२०१६ वेळ १५:०० तारीखे पर्यंत ०५/०२/२०१६ वेळ १६:३५
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख ०२/०२/२०१६, वेळ १५:००
Information received at P.S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ........, तारीख ........, वेळ ........
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव शुक्रना हॉटेलच्या समोर, टी.एस.जी कंपाऊंड, साकीनाका, मुंबई, ठिकाणाचे नंबर ........, गल्ली ........, रस्त्याचे नाव ........
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name पंकज चौधरी (b) वडीलाचे / पतीचे नाव गणेश चौधरी
Father's /Husband's Name
(c) जन्म तारीख व वय ४० वर्ष (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ९३२२२३१५८५
Date of Birth & Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ........ दिल्याचा दिनांक ........ दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय ........
Passport No. हिंदु Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion ........, जात Caste ........ जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता अवहोडा शिवशक्ति, गल्ली / सेक्टर नं. ........ घर / नाव नंबर १५ मोहल्ला विलेज, साकीनाका पाईप लाईन फोन / मो. नंबर ........ पॅन नं. ........ वोटर्स नं. ........
Address : Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Card No.
रस्त्याचे नाव अंधेरी (पूर्व), मुंबई जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........ गाव ........ पोस्ट ........ पो. स्टे. ........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........ सध्याचा पत्ता ........
Taluka Distt. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
(१) आलोसे मिलिंद यशवंत किर वय ५० वर्षे
(२) आलोसे महेंद्र चंद्रकांत शिर्के वय ५५ वर्षे

Scanned by CamScanner

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ............ तात्काळ
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ............
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ............
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

खालील नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी लोकसेवक यांनी फिर्यादीकडे कारखान्यासाठी लागणारे ट्रेड लायसन्स नसल्याने कारवाई न करण्यासाठी रु. २००००/- च्या लाचेची मागणी केली तडजोडी अंती रु १५०००/- लाचेची रक्कम स्विकारल्याने रंगेहाथ पकडले म्हणुन गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
............

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
............

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............,
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .................. Rank.................. No. ..............
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .............................................. (3) Transferred to P.S ..............................................,
District .............................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.
(R.O.A.C.)

पंकज कुमार [signature]

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही. [signature]
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ... विजय यादव
पदनाम Rank ... पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र. ............
Posting
Code No. of I. O. ............................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ............
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned by CamScanner

# फिर्याद

दि. ०५/०२/२०१९

पंकज गणेश चौधरी, वय ४० वर्षे, धंदा—व्यवसाय, रा.ठि—रुम नं. १५, अवधेश निवास, मोहिली व्हिलेज, साकीनाका पाईप लाईन, साकीनाका, अंधेरी (पुर्व), मुंबई, व्यवसाय पत्ता— श्री गणेश डाईंग, टी. जी. कम्पाऊन्ड, खैरानी रोड, साकीनाका, मुंबई.मो नं. ९३२२२३१५८५.

——— ० ———

मी वरील प्रमाणे असुन, वर नमुद ठिकाणी मागील०७ वर्षापासून माझ्या कुटुंबासह राहत आहे. तसेचमी वरील नमुद पत्त्यावर श्री गणेश डाईंग,नावाने रेडिमेड कपडे वाशिंग व डाईंगचा व्यवसाय सुमारे ०३ वर्षापासून करीत आहे. दि. ०२/०२/२०१९ रोजी दुपारी ०३.०० वाजण्याच्या सुमारास माझ्या कारखान्याच्या ठिकाणी एल— वार्ड, लायसन्स विभाग, कुर्ला, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई येथून ०२ लायसन्स इन्स्पेक्टर आले होते. त्यांनी माझ्याकडे कारखान्याचे ट्रेड लायसन्सची मागणी केली. मी त्यांना माझ्याकडे ट्रेड लायसन्स नसल्याचे सांगितले, त्यावेळी त्यातील एका अधिकाऱ्याने त्यांचे नाव शिर्के साहेब असल्याची ओळख करुन दिली. त्यानंतर त्यांनी मला तुम्हाला दंड भरावा लागेल, तुम्हाला माहिती आहे का किती दंड भरावा लागतो ते ? रुपये ५०,०००/— इतका दंड भरणा करावा लागेल, असे सांगितले. त्यावर त्यांनी मला कारवाई न करण्यासाठी रुपये २०,०००/— ची लाचेची मागणी केली. मी त्यांना माझ्याकडे एवढे पैसे नसल्याचे सांगितले. तद्नंतर शिर्के साहेबांनी सोमवारी म्हणजेच दि. ०४/०२/२०१९ रोजी सुमारे ११.०० ते १२.०० वाजताच्या दरम्यान मागणी केलेली रक्कम तयार ठेवण्यास सांगितले व ते दोन्ही अधिकारी माझ्या कारखान्यातून निघुन गेले. सदरवेळी माझा भाचा राकेश चौधरी हा माझ्यासोबत होता. त्यावेळी शिर्के साहेबा सोबत असणाऱ्या अधिकाऱ्याने त्याचा स्वत:चा मोबाईल नंबर माझ्या भाच्याला दिला व त्याचा मोबाईल नंबर घेतला. सदर घटनेनंतर मला माझा मित्र इमरान भेटला. इमरानचा माझ्या कारखान्या शेजारीच लेथ मशिनचा कारखाना आहे. त्यांनी मला तुझ्याकडे लायसन्स डिपार्टमेंटच्या अधिकाऱ्यांनी किती पैसे मागितले अशी विचारणा केली असता त्यांनी मला रुपये २०,०००/— ची मागणी केली असल्याचे मी सांगितले. तसेच लायसन्स डिपार्टमेंटच्या अधिकाऱ्यांनी त्याच्याकडे ही रु. २०,०००/— ची मागणी केली असल्याचे मला सांगितले.

त्यानंतर मी दि. ०३/०२/२०१९ रोजी १२.४५ वाजताच्या सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची हेल्पलाईन क्र. १०६४ वर संपर्क करुन घडलेली हकीकत सांगितली. सदर वेळी श्री. यादव, पोलीस निरीक्षक यांनी मला लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे येवून तक्रार नोंद करण्यास सांगितले. त्या अनुषंगाने मी सायं. ५.०० वा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई या कार्यालयात जाऊन माझी लेखी तक्रार दिली. पुढे पोलीस निरीक्षक यादव यांनी मला पुन्हा दि. ०४/०२/२०१९ रोजी सकाळी कार्यालयात बोलविले.

त्याप्रमाणे मी दि. ०४/०२/२०१९ रोजी सकाळी १०३० वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे जावून पो.नि. यादव यांना भेटलो. त्यावर त्यांनी मला त्यांच्या कार्यालयात श्री योगेश उमाजी मोरेव श्री संघरत्न आनंदराव लोणे यांची ओळख करुन दिली व ते पडताळणी वसापळा कारवाई दरम्यान पंच म्हणून काम करणार असल्याचे त्यांनी मला सांगितले. त्यानंतर पो.नि. यादव यांनी पहिल्या

पंकज कुमार चौधरी

Scanned by CamScanner

मजल्यावर असलेल्या गोपनीय कक्षात मला वं त्यांचेसोबत दोन्ही पंच यांना घेवून आले. तेथे मला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व मेमरी कार्डची माहिती देवून त्यामध्ये माझे, दोन्ही पंच व स्वत: पोनि. यादव यांचे वक्तव्य नोंद करण्यात आले. तद्नंतर मी, नमुद पंच व पो.नि. यादव, सपोआ. चिंचकरयांचेसह सापळयातील त्यांचे अधिकारी/कर्मचारी शासकीय वाहनातून माझे कारखान्याजवळ असलेल्या गुरुव्दाराच्या कंपाउंडमध्ये दुपारी १२.०० वाजताच्या सुमारास पोहोचलो. त्यानंतर पो.नि. यादव यांनी मला व सोबत आलेले पंच श्री योगेश उमाजी मोरे यांना वरील नमुद महानगरपालिकेचे अधिकारी आल्यानंतर त्यांनी लाचेच्या मागणीची पडताळणी करणार असल्याचे सांगितले. तसेच सदर पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या योग्यत्या सुचना दिल्या.त्यानंतर दुपारी ३.०० वाजताच्या सुमारास माझा भाचा श्री राकेश चौधरी यांचे मोबाईलवर लायसन्स अधिकारी यांचाफोन आला व त्यांनी मला सुकराना हॉटेलच्या समोर टी.एस.जी. कपाऊंडच्या गेटजवळ बोलावले असल्याचे सांगितले.मी व पंच श्री मोरे कारखान्याबाहेर असलेल्या टी.एस.जी. कंपाऊंडमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यास भेटलो. त्याने मला तेथे उभ्या असलेल्या त्यांचे मारुती अल्टो कारमध्ये बसण्यास सांगितले. मी कारमध्ये बसल्यावर त्याने माझ्याशी ट्रेड लाससन्स बाबत चर्चा केली व माझ्या कारखान्यावर कारवाई न करण्यासाठी माझ्याकडे रु. २०,०००/– एवढी लाचेची मागणी केली. तडजोडी अंती रु. १५,०००/–स्विकारण्याचे मान्य केले वमला सदर रक्कम आणण्यास सांगितले. त्यावेळी त्या अधिकाऱ्याने त्यांचे नाव किर, लायसन्स डिपार्टमेंट, एल वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई असे सांगून महेंद्र शिर्के हे त्यांचेमोठे साहेब असल्याचेसांगितले. तसेच ते चेंबूर येथे असून थोडयावेळात येथे येणार असल्याचे सांगितले व ते तेथून निघून गेले.

तद्नंतर मी व पंच पोलीस वाहनाजवळ आलो व घडलेली हकिकत पो.नि. यादव यांना सांगितली. पो.नि. यादव यांनी रेकॉर्डरमधील संभाषण ऐकले व लाचेची मागणी झाल्याची त्यांची खात्री झाल्यानंतर मी माझ्याकडील लाच देण्यासाठीची रक्कम रु. १५,०००/– हजर केले. सदर लाचेच्या रकमेस अॅन्थ्रासिन पावडर लावून सापळा पथकातील चालकाने माझ्या शर्टच्या डाव्या बाजूच्या खिशात ठेवली. त्यानंतर मी व पंच असे दोघे लायसन्स इन्स्पेक्टर किर यांना भेटण्यास गेलो. किर यांची मोटारकार त्याच जागी होती परंतु ते तेथे नसल्याने मी, पंच मोरे यांचे समक्ष किर यांना मोबाईलवर संपर्क केला असता त्यांनी मी पावती फाडत आहे, थोडयावेळेत येतो असे सांगितले. परंतु बराचवेळ झाला तरी आले नसल्यामुळे मी व पंच मोरे पुन्हा कारखान्यात येऊन बसलो. तद्नंतर सुमारे ४.३० वा. चे सुमारास किरयांचा मला माझ्या मोबाईलवर फोन आला व त्यांनी मला पुन्हा बाहेर दुपारी भेटलेल्या ठिकाणी त्यांच्या कारजवळ बोलविले. त्याप्रमाणे मी व पंच मोरे सदर ठिकाणी परत गेलो. सदर ठिकाणी किर व त्यांचे साहेब महेंद्र शिर्केहे दोघे बोलत उभे असल्याचे मला दिसले. मी त्यांचेजवळ जात असता त्यांनी मला पहाताच ते दोघे मोटारकार मध्ये जाऊन बसले. किर हे डायव्हिंग सिटवर बसलेले होते तर शिर्के हे त्यांच्या शेजारच्या सिटवर बसले होते. त्यांनी मला मोटारकारमध्ये मागील सिटवर बसण्यास हाताच्या इशा–याने सांगितले. मोटारकारमध्ये बसल्यावर किर यांनीपैसे आणले आहेत का? अशी विचारणा केली त्यावर मी किर यांना माझ्या शर्टाच्या खिश्यातील रुपये १५,०००/– काढुन दिले. ते त्यांनी त्यांच्या उजव्या हाताने स्विकारुन त्यांच्या पॅंटच्या पुढील उजव्या खिशात ठेवले. तद्नंतर मी सदर गाडीतून बाहेर आल्या बरोबर मला दिलेल्या सुचनेप्रमाणे मी डोक्यावरुन वारंवार डावा

पंकज कुमार चौधरी

Scanned by CamScanner

हात फिरवून लाच स्विकारल्याबाबत नियोजित इशारा केल्यानंतर पो.नि. यादव व सापळयातील त्यांच्या सहकाऱ्यांनी तात्काळ घटनेच्या ठिकाणी आले व मो/कारमधील लोकसेवक मिलिंद यशवंत किर, अनुज्ञापन निरीक्षक व महेंद्र चंद्रकांत शिर्के, वरिष्ठ अनुज्ञापन निरीक्षक यांना वाहनातून लाचेच्या रकमेसह ताब्यात घेतले.

मिलींद किर, अनुज्ञापन निरीक्षक व महेंद्र चंद्रकांत शिर्के, वरिष्ठ अनुज्ञापन निरीक्षक, एल वॉर्ड बीएमसी मुंबई यांनी माझ्याकडे ट्रेड लायसन नाही म्हणून कारवाई न करण्यासाठी रु. २०,०००/- एवढी लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु. १५,०००/-च्या लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले आहे म्हणून माझी त्याच्यांविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

पंकज कुमार त्रिपाठी

Scanned by CamScanner